# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** दापोडी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0119 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**28/06/2025 00:14

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 26/06/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/06/2025
**Time From (वेळेपासून):** 17:32 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:21 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/06/2025 **Time (वेळ):** 23:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 017
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/06/2025 23:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
ईशान्य, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** उप निबंधक कार्यालय, दापोडी, , पुणे- 6

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): भिवाजी शिवाजी शिंगटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लट नं 151, माऊली रेसिडन्सी,फ्लट नं 404, सेक्टर नं 2,इंद्रायणी नगर, भोसरी , पुणे ,दापोडी ,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लट नं 151, माऊली रेसिडन्सी,फ्लट नं 404, सेक्टर नं 2,इंद्रायणी नगर, भोसरी , पुणे ,दापोडी ,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9604043194

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संगिता पथ्वीराज चौधरी | संगिता सुभद्रा बाबुराव किरवले | | 1. एम-बिल्डींग, फ्लट नं 50,, क्विन्स गार्डन, शासकिय , क्वार्टर्स, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | मुकंद भास्कर पवार | | | 1. उपनिबंधक, सहकारी संस्था, , दापोडी, पुणेवर्ग-1,दापोडी , पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):



Scanned with CamScanner

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम मागणी केली. | 3,700.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

3,700.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

जबाब ता. 27/6/2025

मी भिवाजी शिवाजी शिंगटे, वय 39 वर्ष, व्यवसाय – शिक्षण, रा. प्लॉट नं. 151, माऊली रेसिडन्सी फ्लॅट नं. 404, सेक्टर नं. 2, इंद्रायणी नगर, भोसरी , पुणे . मो. नं. 9604043194

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 26/06/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दिली होती की, "मी वरील ठिकाणी माझी पत्नी व मुलासह राहण्यास असून मी मॉडर्न कॉलेज, पुणे येथे लॉ चे दुस-या वर्षात शिक्षण घेत आहे. आमची माऊली रेसिडन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत सेक्टर नं. 02, प्लॉट नं.151, इंद्रायणीनगर, भोसरी पुणे नावाची सहकारी सोसायटी आहे. आमची सोसायटी ही 4 मजली ईमारत असुन त्यामध्ये एकुण 16 फ्लॅट्स आहेत. सर्व 16 फ्लॅटसचे मालक हे आमचे सोसायटीचे सभासद आहेत. आमचे सोसायटीचे रजिस्ट्रेशन (नोंदणी) करणेकरिता आम्ही सर्व सभासदांनी मिळुन प्रस्ताव तयार केला होता. सोसायटी रजिस्ट्रेशनचे कामकाज पाहणेकरिता सर्व सभासदांनी सर्वानुमते मला शासकिय व अर्थिक अधिकार देणेबाबतचे अधिकारपत्र दिनांक 25/03/2025 रोजी दिले होते. त्या अधिकारपत्रानुसार मी आमचे सोसायटीचे रजिस्ट्रेशनचा प्रस्ताव दिनांक 28/03/2025 रोजी उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (6), दापोडी या कार्यालयात जावुन भोसरी एरियाचे काम पाहणा-या श्रीमती संगिता सुभद्रा बाबुराव किरवले-चौधरी यांचेकडे दिला होता. त्यावेळी त्या मला म्हणाल्या की, या कामासाठी साहेबांना देण्यासाठी पैसे लागतील. मी किती असे विचारले असता त्यांनी त्यांचे मोबाईलवरील कॅल्क्युलेटरवर 700*16= 11200 असे टाईप केले. (प्रत्येक सभासदाचे 700/- प्रमाणे) त्यावेळी माझ्याकडे पैसे नव्हते म्हणुन मी त्यांना नंतर देतो असे बोललो.

दिनांक 02/04/2025 रोजी मी आमचे रजिस्ट्रेशन प्रस्तावाचे काम कुठपर्यंत आले हे पाहण्यासाठी उपनिबंधक कार्यालय, दापोडी येथे गेलो असता तेथील सहकारी अधिकारी, श्रेणी-2 श्रीमती संगिता सुभद्रा बाबुराव किरवले-चौधरी यांनी माझ्याकडे संस्थेच्या नावाने बांकेत खाते उघडण्याकरिता परवानगी मिळणेकरिता चे पत्र देतेवेळी 2500/- रुपयांची लाच मागणी केली. त्यावेळी मी नाईलाजाने त्यांना 2500/- रुपये दिले. त्या पत्राचे आधारे मी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे शाखा, भोसरी पुणे या बँकेमध्ये खाते उघडले. खाते उघडल्यानंतर उपनिबंधक कार्यालयाकडुन दिलेल्या चलनानुसार प्रती सभासद शेअर्स रु. 500/- व प्रवेश फी 100/- प्रमाणे 600/- असे एकुण (600 * 16) 9600/- रुपये बँकेत भरले. पैसे बांकेत भरल्यानंतर चलनाची प्रत उपनिबंधक कार्यालयात जमा केली. त्यानंतर दि. 09/04/2025 रोजी संगिता मॅडम यांनी मला 2500/- रुपयांचे चलनाच्या दोन प्रती दिल्या व 2500/- रुपये ट्रेझरी मध्ये भरण्यास सांगितले. जे मी ट्रेझरी मध्ये भरले. त्यानंतर मी संगिता किरवले मॅडम यांचे मोबाईल नंबर 8805036306 वर फोन करुन आमचे सोसायटीचे नोंदणी प्रमाणपत्राचे काम झाले का याबाबत विचारले असता त्यांनी नोंदणी प्रमाणपत्र तयार असल्याचे सांगितले. म्हणुन मी दिनांक 03/06/2025 रोजी त्यांचे कार्यालयात गेलो असता त्यांनी मला 5000/- रुपये लाच मागणी केली. मी पुन्हा नाईलाजाने त्यांना 5000/- रुपये दिले. त्यानंतरच त्यांनी मला नोंदणी प्रमाणपत्र दिले. अधिकारपत्रा सोबत शासकीय कामकाजासाठीची फीस वगैरेकरिता सर्व सभासदांनी मिळुन 30,000/- रुपये गोळा करुन माझ्याकडे दिले होते त्यातुनच मी वरील सर्व पैसे दिले होते.

दिनांक 24/06/2025 रोजी मी सोसायटी रजिस्ट्रेशन झाल्यानंतर सोसायटीचे नावाने बांक खाते उघडण्यासाठी



Scanned with CamScanner

इंडियन ओव्हरसिज बँक, भोसरी येथे गेलो असता बांकेने मला नोंदणी प्रमाणपत्र, आधारकार्ड, पॅन कार्ड, लाईट बील व उपविधी ( by-laws) या कागदपत्रांची मागणी केली. मला उपनिबंधक कार्यालयातुन संगिता मॅडम यांनी उपविधी दिले नव्हते जे की नोंदणी प्रमाणपत्रासोबत देणे बंधनकारक होते. म्हणुन मी दिनांक 25/06/2025 रोजी संगिता मॅडम यांचेकडे जावुन उपविधीची मागणी केली. त्यावेळी पुन्हा त्यांनी त्यांचे मोबाईलवरील कॅल्क्युलेटरवर 700*16-7500=3700 असे टाईप करुन बाकी आहेत असे म्हणाल्या. त्यावर मी ठिक आहे असे बोलुन निघुन आलो. मला सुरुवातील मागणी केलेल्या 11200/- रुपयांपैकी त्यांनी बँक खाते उघडण्याचे परवानगीकरिता 2500/- व नोंदणी प्रमाणपत्र देताना 5000/- रुपये घेतले होते. उरलेल्या 3700/- रुपयांची त्या मला मागणी करत आहेत. परंतु मला आता त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. त्यामुळे मी आज रोजी आपणाकडे तक्रार देत आहे. त्यामुळे आपण आपले विभागामार्फत त्यांचेवर कार्यवाही करावी. यासोबत मी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, उपनिबंधक कार्यालयातुन दिलेले बँक खाते उघडण्याचे परनागीचे पत्र, अधिकारपत्र व प्लॉटचे इंडेक्स - 2 हजर करीत आहे.

माझे व उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (6), दापोडी कार्यालयातील सहकारी अधिकारी, श्रेणी - 2 श्रीमती संगिता सुभद्रा बाबुराव किरवले-चौधरी यांचेत कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत अथवा सदर कामाचे व्यतिरिक्त कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. संगिता मॅडम यांनी यापुर्वी घेतलेले पैसे हे कोणतीही शासकिय फिस नाही. तरी आपण श्रीमती संगिता किरवले यांचेवर लाच मागणी संदर्भाने योग्य ती कार्यवाही करावी अशी विनंती केली तसेच माझे उजव्या हाताचे बोट सुजल्यामुळे मला लिहण्यास त्रास होत असल्याने माझे विनंतीवरुन माझी तक्रार दिनांक 26/06/2025 रोजी संगणकावर टंकलिखीत करण्याची विनंती केली त्यावरुन माझे सांगणेप्रमाणे दिनांक 26/06/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे पंचांसमक्ष वरील आशयाची तक्रार दिली"

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 26/06/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरोतील श्रीमती मिसाळ, पोलीस उप अधीक्षक यांनी दोन पंच पडताळणीकामी बोलावून घेऊन पंचासमक्ष पडताळणी कारवाई केली. त्यावेळी माझे व पंच क्र.1 श्री.रावसाहेब शिवनाथ काकड यांचे निवेदन 17.27 वा. घेतले. मला व पंच क्र. 1 यांना सुचना देऊन शासकीय पंचासह माझ्याकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देऊन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (6),दापोडी कार्यालयात 17.32 वा. पाठविले. मी व पंच क्र.1 असे माझे होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम.एच.14.एच.आर. 5856 वरुन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (6), दापोडी या कार्यालयात गेलो व सहकारी अधिकारी, श्रेणी-2 श्रीमती संगिता सुभद्रा बाबुराव किरवले-चौधरी यांची समक्ष भेट घेतली. त्यावेळी कामाचे अनुषंगाने बोलणी केली त्यानंतर लोकसेवक उपनिंबधक साहेब श्री. मुकुंद भास्कर पवार यांना जावून भेटलो, त्यांचे सोबत कामाचे अनुषंगाने बोलणी सुरु असताना त्यांनी आमची व पंच क्र. 1 यांची चौकशी करुन माझे सोबत अवांतर बोलणी केली. त्यानंतर लोकसेवक श्रीमती संगिता सुभद्रा बाबुराव किरवले-चौधरी, सहकारी अधिकारी, श्रेणी - 2, हया तेथे आल्यानंतर मी त्यांना बायलॉजची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्यावर त्या मला हजार रूपये असतात तुमच्याकडून कमी घेतले असे मला म्हणत होत्या म्हणजेच प्रत्येक सभासदाचे प्रत्येकी हजार रूपये असतात परंतु त्यांनी मला प्रत्येक सभासदाचे प्रत्येकी रू. 700/- प्रमाणे सांगितले असल्याचे मला बोलत होते. त्यानंतर काही वेळाने श्रीमती संगीता किरवले-चौधरी मॅडम मला "उलट मी कमी सांगितलं म्हटलं. कमी सांगितलं ना?" असे मला म्हणाल्या. त्यावेळी त्याठिकाणी हजर असणारे लोकसेवक उपनिबंधक श्री मुकुंद पवार हे "ठीक आहे, पण कसं आहे बाकीचं तुम्ही एजन्सी नेमले तर तुम्हाला जास्त लागलं असतं, बरोबर ये ? तुम्ही डायरेक्ट आल्यामुळे समजा तुमचं काम कमीत झालं " असे म्हणून मला श्रीमती किरवले यांनी सांगितलेली लाचेची रक्कम योग्य कशी आहे हे श्री. मुकुंद पवार सांगत होते. इतर संभाषणानंतर मी लोकसेवक उपनिबंधक श्री मुकुंद पवार यांना सर आम्हाला डिस्काऊंट देत नाहीत असे बोललो असता श्रीमती किरवले मॅडम या उपनिबंधक मुकुंद पवार यांचेसमक्ष मला "डिस्काउंट नाही. डिस्काउंट दिले ना. हजार रुपये म्हणले होते पुन्हा कमी सांगितलं मी", त्यावर श्री. मुकुंद पवार साहेब हे "ठिकय करा" असे बोलले. त्यानंतर इतर बोलणी झाली. मी ATM मधुन जाऊन येतो असे सांगितल्यावर संगिता मॅडम या जावुन पटकन या असे बोलल्या. माझ्या पडताळणी कारवाईदरम्यान पंच क्र. 1 श्री. काकड हे माझ्यासह हजर होते त्यांच्यासमक्षच लाचेसंदर्भात श्रीमती संगिता मॅडम व श्री. मुकुंद पवार यांनी बोलणी केली आहे. त्यानंतर मी पडताळणी पथकाजवळ गेलो तेथे माझ्यात व लोकसेविका संगिता मॅडम यांच्यात झालेल्या संभाषण ऐकल्यानंतर नक्की किती रक्कमेची लाच देणे बाकी आहे याबाबत स्पष्टपणे उल्लेख नसल्याने अधिकची स्पष्टता येण्यासाठी व्हाईस रेकॉर्डर चालु करून मी माझे मोबाईल फोनवरून श्रीमती संगीता मॅडम यांच्या मोबाईल फोनवर कॉल केला परंतु त्यांनी तो उचलून आवाज येत नाही असे म्हणाल्या व फोन कट झाला त्यानंतर पुन्हा एकदा कॉल केला असता त्यांनी तो उचलला नाही. त्यानंतर मला पुन्हा एकदा पडताळणीकामी पाठविण्याचे ठरविले त्यानुसार व्हाईस रेकॉर्डर चालु करून पडताळणी पथकातील पो.हवा.शिंदे यांनी माझ्या शर्टचे आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर चालु करून मला पुन्हा एकदा पंच क्र. 1 यांचेसह माझे होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम.एच.14.एच.



Scanned with CamScanner

आर.5856 हीवरून पडताळणीकामी पाठविले त्यावेळी मी संगिता चौधरी यांना " तुम्हाला पहिले साडे सात दिलेलेत" असे म्हणालो त्यावर संगिता मॅडम " हं " अशा बोलल्या. नंतर मी त्यांना "मग आता,फक्त तिन हजार सातशे रुपये देयचेत" असे विचारल्यावर संगिता मॅडम मला "ठिक ये ठिक ये जा,बघा उद्या आणुन द्या तुमच्याहयानी" असे बोलल्या. मी व पंच तेथुन निघुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. माझ्या पडताळणी कारवाईदरम्यान पंच क्र. 1 श्री. काकड हे माझ्यासह हजर होते त्यांच्यासमक्षच माझ्याकडे लाचेची मागणी झालेली आहे. माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला त्यानंतर मी घडलेला सर्व प्रकार पडताळणी करणारे अधिकारी यांना पंचांसमक्ष सांगितला. त्यानंतर आमचेत डिजीटल व्हाईस रेकॉर्डवर रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉपवर कॉपी करून फास्ट फॉरवर्ड करून पंचांसमक्ष ऐकले असता लोकसेवक संगिता चौधरी यांनी लाचेची मागणी केल्याचे व उपनिबंधक मुकंद पवार यांनी लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पण्ण झाले आहे. परंतु दिनांक 26/06/2025 रोजी उशीर झालेला असल्याने लोकसेविका यांचे कार्यालय बंद झाल्याने दिनांक 26/06/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करून दिनांक 27/06/2025 रोजी सकाळी करण्याचे ठरविले त्यानंतर घडलेल्या सर्व बाबींचा सविस्तर पंचनामा पडताळणी अधिकारी यांनी केलेला आहे.

माझ्याकडे सहकार अधिकारी श्रीमती संगिता चौधरी मॅडम लाच मागणी केल्याचे व त्यास श्री. मुकुंद पवार यांनी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक 27/06/2025 रोजी पुढील कार्यवाही करण्याकरीता ठरल्याप्रमाणे मी दापोडी बस स्टॉपचे अलीकडे येवुन सर्व्हीस रोडवर माझ्याकडील होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम.एच.14.एच. आर.5856 हीवरून पोहोचलो. दिनांक 26/06/2025 रोजीचे मेमरी कार्ड पुढील सापळा कारवाईकामी वापरण्यात आले. सहकार अधिकारी श्रीमती संगिता चौधरी मॅडम यांना मागणी केलेप्रमाणे त्यांना लाचेची रक्कम देण्याकरीता आमचे सोसायटीतील लोकांनी वर्गणी करून माझ्याकडे दिलेल्या रोख रक्कमेपैकी रू 100/- दराच्या 2 नोटा व रू. 500/- दराच्या 7 नोटा अशी एकुण रक्कम रू. 3,700/- पंचांसमक्ष हजर केले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेण्यात आले. त्यानंतर आम्हाला अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून, प्रात्यक्षीक दाखवून मी हजर केलेल्या रकमेस अँन्थ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम ही माझ्या शर्टच्या वरील डाव्या बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर माझे व पंच क्र.1 यांचे सापळा निवेदन 12.46 वा. घेऊन मला, पंचांना व सापळा पथकास योग्य त्या सुचना देऊन सापळा रचण्यात आला. मला लाच स्विकारल्यानंतर माझ्या पॅन्टचे खिशातील हातरुमाल काढून तो तोंडावरून फिरविणेबाबत पुर्वनियोजीत इशारा करण्याची सुचना मला देण्यात आली. त्यानंतर पो.हवा.शिंदे यांनी माझे शर्टचे आतील बाजुस बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून, मला व पंच क्र.1 लाचेच्या रकमेसह माझ्या मोटार सायकलवरून उपनिबंधक कार्यालय दापोडी येथे लोकसेविका श्रीमती संगीता किरवले-चौधरी यांच्याकडे पाठविण्यात आले ती वेळ 12.57 वा. होती.
मी पंच क्र. 1 सह उपनिबंधक कार्यालय, दापोडी येथे जाऊन सहकारी अधिकारी श्रीमती संगिता चौधरी यांची भेट घेतली. त्यावेळी मी त्यांना "पहिले साडे सात हजार,हे तिन हजार सातशे, असे बोललो तेव्हा त्यांनी हं,ठिक ये असे बोलल्या त्यानंतर मी माझ्या शर्टच्या वरच्या खिशात ठेवलेली लाचेची रू. 3,700/- रक्कम माझ्या उजव्या हाताने काढून लोकसेविका श्रीमती संगीता मॅडम यांचेसमोर धरली. ती लाच रक्कम त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून माझ्यासमक्षच त्यांच्या शेजारी असणारे एका पर्स कम सॅग सारख्या दिसणारे गुलाबाची नक्षी असलेल्या व हिरवे व पांढरे पट्टे असणारे बॅगेच्या वरील कप्यात ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा बेताने माझ्या पॅन्टच्या खिशातील हातरुमाल काढून त्याने तोंड पुसून सापळा पथकास लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. सापळा कारवाईदरम्यान पंच क्र. 1 श्री. काकड हे माझ्यासह हजर होते त्यांच्यासमक्षच श्रीमती संगीता किरवले-चौधरी यांनी लाचेची रक्कम स्विकारलेली आहे. मी इशारा केल्यानंतर लागलीच सापळा पथकाने सहकार अधिकारी श्रीमती संगिता चौधरी यांना लाचेची रक्कमेसह 13.21 वा. ताब्यात घेतले व लोकसेविका श्रीमती संगीता मॅडम यांच्या ताब्यात असणारे सॅग कम बॅगमधून मिळालेली लाचेची रक्कम ताब्यात घेतली. त्यावेळी श्रीमती संगीता किरवले-चौधरी या खुप घाबरल्या होत्या. सापळापुर्व पंचनाम्यावेळी कागदावर लिहुन घेतलेले नोटांचे नंबर व श्रीमती संगीता मॅडम यांच्या ताब्यात मिळालेली लाचेची रक्कम ही एकच असल्याची खात्री सापळा अधिकारी यांनी केली. तसेच त्यांचे ताब्यात मिळालेल्या लाचेच्या रकमेची अल्ट्राव्हायोलेट दिव्याने पाहणी केल्यावर लाच रक्कमेवर अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली तशीच चकाकी संगिता चौधरी यांच्या उजव्या हाताच्या बोटांना अॅन्थ्रासीन पावडर लागली असल्याचे दिसून आले आहे. तसेच माझ्या हाताची व कपडयांची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात पाहणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांना व शर्टच्या वरील डावे बाजूचे खिशाचे आतील बाजुस अॅन्थासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. सदरबाबत व्हिडीओ रेकॉर्डींग



Scanned with CamScanner

करण्यात आली आहे या सर्व बाबींची सविस्तर पंचनामे व स्क्रिप्ट पंचांसमक्ष करण्यात आली आहे. कारवाईदरम्यान संगीता मॅडम यांचे रेकॉर्डवरील पुर्ण नाव श्रीमती संगिता पृथ्वीराज चौधरी असे असल्याचे निष्पन्न झाले आहे. तरी मी दि. 26/06/2025 रोजी दिलेल्या तक्रारीवरून दि. 26/06/2025 रोजी 17.32 वा. ते 19.25 वा.चे दरम्यान करण्यात आलेली पडताळणी कारवाई व आज दि.27/06/2025 रोजी 12.57 ते 13.21 वाजण्याचे दरम्यान करण्यात आलेली सापळा कारवाईवरून माऊली रेसिडन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत, सेक्टर नं. 02, प्लॉट नं.151, इंद्रायणीनगर, भोसरी पुणे सहकारी गृहरचना संस्थेची नोंदणी करण्यासाठी व बाय लॉज (उपविधी) देण्यासाठी श्रीमती संगिता सुभद्रा बाबुराव किरवले-चौधरी ऊर्फ संगिता पृथ्वीराज चौधरी, वय 50 वर्षे, व्यवसाय -सहकार अधिकारी, श्रेणी-2, उपनिबंधक कार्यालय , दापोडी, पुणे(6), रा. एम-बिल्डींग, फ्लॅट नं. 50, क्विन्स गार्डन, शासकिय क्वार्टर्स, पुणे. मुळ पत्ता- फ्लॅट नं. 805, एफ-वींग, विन्डसर काऊंटी, दत्तनगर, कात्रज, पुणे -46 यांनी स्वत:साठी रू. 3,700/- लाचेची मागणी करून उपनिबंधक कार्यालय, दापोडी, पुणे (6) येथे स्विकारली असुन मुकंद भास्कर पवार, उपनिबंधक, सहकारी संस्था, दापोडी, पुणे यांनी लाच मागणीस प्रोत्साहन दिले आहे म्हणून माझी त्या दोघांचेविरूध्द फिर्याद आहे.
सदरची फिर्याद ही माझे सांगणेप्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखित करणेत आली असून ती मी वाचुन पाहिली असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.
समक्ष हा जबाब लिहुन दिला स.ता.म

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
NILESH DATTA WAGHMARE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** NILESH DATTA WAG

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI

ठाणे अंमलदार
दापोडी पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड आयुक्तालय



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**))**

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**



Scanned with CamScanner